# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. ११
## सभावृत्तांत

दिनांक :- २९/१/२०१६ वेळ :- दु. १२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक २९/१/२०१६ रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव - अध्यक्ष
२. मा.भाऊसाहेब भोईर
३. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४. मा.शमीम पठाण
५. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
६. मा.अपर्णाताई डोके,
७. मा.को-हाळे अनंत सुभाष
८. मा.शिदे शितल उर्फ विजय गोरख
९. मा.जयश्री वसंत गावडे
१०. मा.साबळे छाया जगन्नाथ
११. मा.विमलताई जगताप
१२. मा.आप्पा उर्फ संपत पवार
१३. मा.बारणे निलेश हिरामण
१४. मा.झामाबाई बाळासाहेब बारणे
१५. मा.शेखर अशोक ओव्हाळ
१६. मा.पवार यमुनाताई रमणनाना
१७. मा.कलाटे स्वाती मयूर
१८. मा.शरद माणिकचंद लुणावत स्वीकृत सदस्य

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.सुभाष माछरे – क्षेत्रिय अधिकारी ,मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा.गटटुवार - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.शशिकांत मोरे – कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.रामदास तांबे – कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.सी.एन.धानोरकर – उपअभियंता, स्थापत्य , मा.के.डी.फुटाणे – उप अभियंता स्थापत्य विभाग, मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.संध्या वाघ, उपअभियंता , स्थापत्य, मा.मिनानाथ इनामदार – लेखाधिकारी, श्री.के.डी.दरवडे, सहा.आरोग्याधिकारी, इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. १०, दि. १८/१२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

तदनंतर **उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक ४ प्रभाग क्रमांक २० चिंचवडेनगर वाल्हेकरवाडी ते चापेकर चौक रस्त्यावरुन उजवीकडे बिर्ला हॉस्पीटलकडे जाणा-या चौकास श्री संत नामदेव महाराज मार्ग असे नामकरण करण्याचा ठराव दिनांक १९/८/२०१५ रोजी विषय क्रमांक १० करण्यात आला होता. सदरचा ठराव रदद करुन श्री संत नामदेव महाराज चौक असे नामकरणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.भाऊसाहेब भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ५ प्रभाग क्रमांक ५२ पुनावळे ताथवडे येथील विविध रस्ते, नगरास , चौकास नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.शेखर ओव्हाळ यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक ६ प्रभाग क्रमांक २२ चिंचवडगांवठाणमध्ये विठठल रखुमाईचे मंदीर हे गावडे भोईर आळी येथे असून सदर रस्ता हा केशवनगर याठिकाणी जात आहे. तरी सदर रस्त्यास कै.शि वाजी नामदेव गावडे पथ असे नामकरण करणेस मान्यता देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे मा.संदिप गुलाबराव चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ७ चिंचवड काळेवाडी रोडवर असणा-या कुणाल इस्टेटजवळील बस स्टॉपला मोरया मंदीर बस स्टॉप हे नांव चुकीचे दिले असून, त्या बस स्टॉपला कल्याण प्रतिष्ठान बस स्टॉप असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अपर्णाताई डोके यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ८ चिंचवड चापेकर चौक उडडाण पुलाखाली महाराष्ट्र बॅंकेसमोरील उडडाण पुल पीलर्स क्र.पी.१, ते पी.३ भागातील जागा वाहनतळासाठी सिमेंट रस्ता कामकाज पुर्ण होईपर्यंत किंवा ११ महिने भाडेतत्वावर देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.संदिप गुलाबराव चिंचवडे यांचा प्रस्ताव

ठराव क्र. ६७ विषय क्र. १
दि. २९/१/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. झामाबाई बारणे अनुमोदक: मा.निलेश बारणे

संदर्भ :- मा. झामाबाई बारणे यांचा दिनांक १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

विषय :- थेरगांव येथील स.नं.२२/५ मधील क्षेत्र १ हेक्टर ०० आर या मिळकतीचा आगाऊ ताबा पिंपरी चिंचवड मनपास अ, ब पत्राव्दारे ज्या जमीन मालकाच्या मालकीची जमीन त्यांनी आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदानसाठी दिलेले आहे. सदर खेळाचे मैदानास कै.रामभाऊ मोरु बारणे व कै.बारकु मोरु बारणे असे नांव देवून नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ६८ विषय क्र. २
दि. २९/१/२०१६ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. निलेश बारणे अनुमोदक: मा. स्वाती कलाटे

संदर्भ :- मा. माया संतोष बारणे यांचा दिनांक २०/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

विषय :- प्रभाग क्रमाक ५१ गणेशनगर – बेलठिकानगर थेरगांव परिसरातील पंचशिल कॉलनी क्रमांक १ डॉ.बाबासाहेब आंबेडकर पथ, २. पंचशिल कॉलनी क्रमांक २ ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पथ, ३. समर्थ कॉलनी गणेशनगर, थेरगांव, ४. मयुरबाग कॉलनी गणेशनगर, वाकडरोड, थेरगांव या रस्त्यांचे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.माया संतोष बारणे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ६९ विषय क्र. ३
दि. २९/१/२०१६ विभाग - प्रशासन विभाग ( लेखा) ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक: मा.शमीम पठाण

संदर्भ :- मा.क्षेत्रीय अधिकारी ब क्षेत्रीय कार्यालय चिंचवड यांचे पत्र क्रमांक बक्षे/लेखा/९/कावि/१४/२०१६, दिनांक २१/१/२०१६

ब क्षेत्रीय कार्यालयाचे सन २०१५-२०१६ चे सुधारित व सन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर अंदाजपत्रकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (सुधारित नांव THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT (Act No LIX of 1949) चे कलम २९ (अ) मधील कलम ७ चे पोटकलम (ब) नुसार मान्यतेकामी शिफारस करणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ७०

विषय क्र. ४

दि. २९/१/२०१६

विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.भाऊसाहेब भोईर

अनुमोदक: मा.आशाताई सुर्यवंशी

संदर्भ :- मा.भाऊसाहेब भोईर यांचा दि. २९/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २० चिंचवडेनगर ते चापेकर चौक रस्त्यावरुन उजवीकडे बिर्ला हॉस्पीटलकडे जाणा-या चौकास श्री संत नामदेव महाराज मार्ग असे नामकरण करण्याचा ठराव दिनांक १९/८/२०१५ रोजी विषय क्रमांक १० करण्यात आला होता. सदरचा ठराव रदद करुन त्या ठिकाणी श्री संत नामदेव महाराज चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला..

ठराव क्र. ७१

विषय क्र. ५

दि. २९/१/२०१६

विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.शेखर ओव्हाळ

अनुमोदक: मा.यमुनाताई पवार

संदर्भ :- मा.शेखर ओव्हाळ यांचा यांचा दि. २९/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रमांक ५२ पुनावळे ताथवउ येथे स.नं.२८, २७ व स.नं.२५ मधून जाणा-या डीपी रस्त्याला वैकुंठवासी ह.भ.प.सोपानराव कोंडीबा गायकवाड मार्ग असे नामकरण करणेस २) तसेच शंकरराव कोंडीबा गायकवाड यांचे घराजवळील लोकवस्तीस गायकवाडनगर नामकरण करणेस (स.नं.२६, २७,२८ व २५) ३) सभाजी शिंदे यांचे घराजवळी लोकवस्तीस केरुमामा शिंदे नगर असे नामकरण करणेस ४) बाळासाहेब रघुनाथ दर्शले यांचे घराजवळील लोकवस्तीस दर्शलेनगर असे नामकरण करणेस ५) राजेंद्र गायकवाड ते शंकरराव गायकवाड यांचे मधील रस्त्याला शिवप्रेमी नगर गायकवाड इस्टेट असे नामकरण करणेस ६) किशोर बांदल यांचे घराजवळील लोकवस्तीस बांदलनगर असे नामकरण करणेस ७) ओव्हाळ कार्नर ते विजय दर्शिले यांच्या घराकडे जाणा-या वस्तीला दर्शिले मळा नामकरण करणेस ८) संकेत शिंदे याच्या घराकडे जाणा-या चौकास शिवस्पर्श चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ७२

विषय क्र. ६

दि. २९/१/२०१६

विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.संदिप गुलाबराव चिंचवडे

अनुमोदक: मा.आश्विनी गजानन चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा.संदिप गुलाबराव चिंचवडे यांचा दि. २९/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २२ चिंचवडगांवठाणमध्ये विठठल रखुमाईचे मंदीर हे गावडे भोईर आळी येथे असून सदर रस्ता हा केशवनगर याठिकाणी जात आहे. तरी सदर रस्त्यास कै.शिवाजी नामदेव गावडे पथ असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ७३ विषय क्र. ७

दि. २९/१/२०१६ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.अपर्णाताई डोके अनुमोदक: मा. अनंत को-हाळे

संदर्भ :- मा.अपर्णाताई डोके यांचा दि. २९/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव

चिंचवड काळेवाडी रोडवर असणा-या कुणाल इस्टेटजवळील बस स्टॉपला मोरया मंदीर बस स्टॉप हे नांव चुकीचे दिले असून, त्या बस स्टॉपला कल्याण प्रतिष्ठान बस स्टॉप असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला..

ठराव क्र. ७४ विषय क्र. ८

दि. २९/१/२०१६ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा. संदिप गुलाबराव चिंचवडे अनुमोदक: मा. आश्विनी गजानन चिंचवडेपाटील

संदर्भ :- मा. संदिप गुलाबराव चिंचवडे यांचा दि. २९/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव

चिंचवड येथील चापेकर बंधु उडडाण पुलाखाली महाराष्ट्र बँकेसमोरील उडडाणपुल खालील भाग क्र.पी १, पी २, पी ३ या पीलर्स क्षेत्र जागेत दोन चाकी तीन चाकी व चार चाकी वाहने पार्किंगसाठी सदर ठिकाणची जागा वाहतुक समस्या विचारात घेता वाहतुक सुरळीतपणे चालु ठेवणेसाठी मनपा आर्थीक हित विचारात घेता व नागरीकांच्या सोयीसाठी पे एॅण्ड पार्क पध्दतीने सदर वाहन क्षेत्र (पी १ ते पी ३ पर्यंतचे जागा क्षेत्र) मा.आयुक्त सो यांचेकडील पत्र क्रमांक भुजि/१/कावि/१५६/२०१३, दि.२०/४/२०१३ मधील अटी शर्तीनुसार मे.समृध्द भारत स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित थेरगांव गांवठाण मारुती मंदीराशेजारील पुणे ३३ यांना सदर ठिकाणी स्थापत्य विभागाची सिंमेंट रस्ता कामकाज पुर्ण होईपर्यंत किंवा ११ महिन्याच्या भाडेतत्वावर देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ ९४ /२०१६.
दिनांक : २५ / ०२ /२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना